महाराष्ट्र पाटबंधारे वित्तीय कंपनी,मर्यादित मार्फत मालिका क्र. IV द्वारे, उभारलेल्या कर्जरोख्यांवरील प्रथम सहामाही शासन हमी शुल्क पुस्तकी समायाजनाने शासनास अदा करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
नियोजन विभाग
शासन निर्णय क्रमांक : एमपीव्हीसीएल २०१७/ प्र.क्र. २१ / का. १४३३
मादाम कामा मार्ग ,हुतात्मा राजगुरु चौक
दिनांक :- २८ नोव्हेंबर, २०१७

<u>वाचा</u>:- शासन निर्णय नि.वि.क्र. पाविम -२००२/प्र.क्र. ४७/ का. १४३३
दिनांक २७ सप्टेंबर. २००२.

<u>प्रस्तावना :-</u>

राज्यातील पाच पाटबंधारे महामंडळांना निधी उपलब्ध करण्यासाठी खुल्या बाजारातून कर्जरोख्याद्वारे निधीची उभारणी करुन या निधीचे वाटप मा. राज्यपालांच्या निदेशानुसार करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने “महाराष्ट्र पाटबंधारे वित्तीय कंपनी लिमिटेड” या विशेष हेतू वाहन संस्थेची स्थापना केली आहे. सदर कंपनीचे दैनंदिन कामकाज व व्यवस्थापन मे. सिकॉम लि. मार्फत केले जाते. कर्जरोखे मालिका I,II,III, व IV द्वारे कंपनीने उभारलेल्या एकूण रु. ७९८.२५ कोटी रोख्यांच्या मुद्दल व व्याजास शासनाने हमी दिलेली आहे. सदर मालिकांपैकी मालिका क्र. I, II व III चे विमोचन (Redemed) करण्यात आले असून सन २०१७-१८ करीता मालिका क्र. IV ची प्रथम सहा माहीची शासन हमीची रक्कम ₹ .५८,६८,०००/- (रुपये अठ्ठावन्न लाख अडुसष्ठ हजार फक्त) आहे. सदरहू हमीची रक्कम शासनास पुस्तकी समायोजनाने अदा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

शासन निर्णय :-

वरील प्रस्तावनेत नमूद केल्यानुसार महाराष्ट्र पाटबंधारे वित्तीय कंपनी मार्फत उभारलेल्या मालिका क्र. IV ची सन २०१७-१८ मधील प्रथम सहा माहीची शासन हमीची रक्कम ₹ .५८,६८,०००/- (रुपये अठ्ठावन्न लाख अडुसष्ठ हजार फक्त) **<u>पुस्तकी समायोजनाने</u>** शासनास अदा करण्यास याद्वारे मंजूरी देण्यात येत आहे.

२. वरील प्रयोजनासाठी आहरण व संवितरण अधिकारी म्हणून श्री. नितीन पालकर, कार्यासन अधिकारी (रोख शाखा), नियोजन विभाग आणि नियंत्रक अधिकारी म्हणून श्रीमती प्र.सं.महाले, उप सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई-४००० ३२ यांना घोषित करण्यात येत आहे.

३. हा ₹ .५८,६८,०००/- (रुपये अठ्ठावन्न लाख अडुसष्ठ हजार फक्त) इतका खर्च **मागणी क्र. ओ-१२, “लेखाशिर्ष ५४६५-सर्वसाधारण वित्तीय व व्यापारी संस्थांमधील गुंतवणूका, पंचवार्षिक योजनांतर्गत योजना, ०१ - सर्वसाधारण वित्तीय व व्यापारी संस्थांमधील गुंतवणूका, १९०- सार्वजनिक क्षेत्र, इतर उपक्रम व बँका इत्यादिमधील गुंतवणूका, (०१) - महाराष्ट्र पाटबंधारे वित्तिय कंपनी मर्यादितसाठी भागभांडवल व सेवा शुल्क (०१)(०१)- महाराष्ट्र पाटबंधारे कंपनी मर्यादितसाठी व सेवाशुल्क (दत्तमत योजनेतर) (५४६५ ००४६) ५४, गुंतवणूका”** या खाली सन २०१७-१८ या वित्तिय वर्षासाठी मंजूर असलेल्या ₹ .५,३६,४८,०००/- (रूपये पाच कोटी छत्तीस लाख अठ्ठेचाळीस हजार फक्त) इतक्या तरतुदीमधून भागविण्यांत यावा. तसेच वरील रक्कम पुस्तकी समायोजनाने लेखाशीर्ष "००७५ -संकीर्ण सर्वसाधारण सेवा ,१०८-हमी फी (००७५ ००५८)" खाली जमा करण्यात यावी.

४. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या मान्यतेने त्यांच्या अनौपचारिक संदर्भ क्र.३२४/२०१७/व्यय ८ दि. २८.०९.२०१७ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७११२८१२५३३१७७१६ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Anil Dattatraya Joshi

Digitally signed by Anil Dattatraya Joshi
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Planning Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=d7de9577f1b6301ba91e582c9402233953565e9fd17971ff1b7a2b8a94cf42c6, cn=Anil Dattatraya Joshi
Date: 2017.11.28 12:57:14 +05'30'

(अ.द.जोशी)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत -

१) मा. विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानसभा/विधानपरिषद, विधानभवन, मुंबई.
२) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) , महाराष्ट्र राज्य-१/२, मुंबई/नागपूर.
३) महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र राज्य-१/२, मुंबई/नागपूर.
४) अधिदान व लेखाधिकारी, मुंबई.
५) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
६) व्यवस्थापकीय संचालक, मे. सिकॉम लि. सॉलिटेअर कार्पोरेट पार्क,बिल्डींग -४, अंधेरी-घाटकोपर लिंक रोड, चकाला, अंधेरी(पूर्व), मुंबई -४०० ०९३.
७) प्रबंधक, महाराष्ट्र पाटबंधारे वित्तीय कंपनी लिमिटेड, द्वारा मे. सिकॉम लि. सॉलिटेअर कार्पोरेट पार्क, बिल्डींग नं-४, अंधेरी-घाटकोपर लिंक रोड, चकाला, अंधेरी (पूर्व), मुंबई -४०० ०९३.
८) उप सचिव(रोख शाखा), नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
९) कक्ष अधिकारी, (रोख शाखा), नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई (५प्रती)
१०) कक्ष अधिकारी ,का. १४२४, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
११) वित्त विभाग, व्यय-८, / अर्थसंकल्प-१६/अर्थबळ/अर्थोपाय /ऋण व हमी.
१२) निवड नस्ती का-१४३३, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.